# मेट्रो ३ : ७० टक्के भुयारीकरण पूर्ण

**मुंबई : कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गिकेचे ७० टक्के भुयारीकरण पूर्ण केल्याची माहिती एमएमआरसीएलने दिली आहे. सध्या एकूण ५५ किमीपैकी ३८.२५ किमी भुयाराचा टप्पा पार पडला आहे. या संपूर्ण भुयारीकरणासाठी २७०३० सेगमेंट रिंग्जचा वापर करण्यात आला आहे.**



**भुयारीकरणाच्या प्रगतीचा तपशील पुढील प्रमाणे**

| पॅकेज | मार्ग | टक्केवारी |
|---|---|---|
| पॅकेज १ | (कफ परेड ते हुतात्मा चौक स्थानक) | ५८ टक्के |
| पॅकेज २ | (सीएसएमटी ते ग्रँट रोड स्थानक) | ८६ टक्के |
| पॅकेज ३ | (मुंबई सेंटर ते वरळी स्थानक) | ३८ टक्के |
| पॅकेज ४ | (सिद्धिविनायक ते शितलादेवी मंदिर स्थानक) | ७४ टक्के |
| पॅकेज ५ | (धारावी ते सांताक्रुझ स्थानक) | ७४ टक्के |
| पॅकेज ६ | (आंतरदेशीय विमानतळ ते आंतरराष्ट्रीय विमानतळ स्थानक) | ६० टक्के |
| पॅकेज ७ | (मरोळ नाका ते आरे स्थानक) | ९७ टक्के |

कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या भुयारी मार्गामुळे दक्षिण मुंबईत प्रवास करणाऱ्या चाकरमान्यांच्या वेळेची बचत होणार आहे. व्यवस्थापकीय संचालक श्रीमती अश्विनी भिडे यांप्रसंगी म्हणाल्या, हा प्रकल्प पूर्ण करताना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. परंतु सर्व परिस्थितीला मेट्रो ३ च्या टीमने समर्थपणे तोंड देत हे यश मिळवल्याचा सार्थ अभिमान आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यावर मुंबईच्या वाहतूक व्यवस्थेत लक्षणीय बदल दिसून येतील. यातून दररोज १७ लाख लोक रोज प्रवास करतील ज्यामुळे रोजच्या ६.५ लाख वाहन फेऱ्या कमी होऊन प्रदूषित वायूंचे प्रमाण प्रतिवर्षी २.६१ लाख मेट्रिक टन एवढे कमी होईल. ७० टक्के भुयारीकरण होणे म्हणजे या प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीच्या दृष्टीने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे.

एमएमआरसीएलच्या माध्यमातून मागील दोन वर्ष प्रत्यक्ष भुयारीकरणाला सुरुवात करण्यात आली. सध्या एकूण १७ टीबीएमच्या माध्यमातून भूगर्भात भुयार खणण्याचे काम सुरू आहे. एमएमआरसीएलच्या माध्यमातून आतापर्यंत २३ ब्रेक थ्रु यशस्वीरीत्या पार पडले आहेत.

## मेट्रो ४ प्रकल्पाचा मार्ग मोकळा

**मुंबई** : कासारवडवली ते वडाळा या प्रस्तावित मेट्रो ४ प्रकल्पासाठी झाडे तोडण्याचा निर्णय घेणाऱ्या मेट्रो प्रशासनाला मुंबई उच्च न्यायालयाने सोमवारी मोठा दिलासा दिला. न्यायमूर्ती सत्यरंजन धर्माधिकारी यांच्या खंडपीठाने महिन्याभरापूर्वी न्यायालयाने वृक्षतोडीवर घातलेली स्थगिती सोमवारी उठवली. न्यायालयाच्या या निर्णयामुळे गेल्या महिनाभरापासून रखडलेले मेट्रो चारचे काम मार्गी लागणार आहे.

ठाणे-मुंबईकरांचा प्रवास सुखकर व्हावा यासाठी एमएमआरडीएमार्फत ठाण्यातील कासारवडवली ते वडाळा मेट्रो ४ प्रकल्प उभारण्यात येत आहे. मात्र, या प्रकल्पात होणारी वृक्षतोड पर्यावरणाची परवानगीशिवाय करण्यात येत असल्याचा आरोप करून ठाणे नागरी प्रतिष्ठान व रोहित जोशी यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. तसेच या मेट्रोचे काम भुयारी करण्यात यावे, अशी मागणी ही याचिकेत केली होती. मागील सुनावणीच्या वेळी न्यायालयाने मेट्रो प्रशासनाला पुढील आदेश मिळेपर्यंत वृक्षतोडीला स्थगिती दिली होती. न्यायमूर्ती सत्यरंजन धर्माधिकारी आणि न्यायमूर्ती रियाज छागला यांच्या खंडपीठासमोर सोमवारी या प्रकरणाची सुनावणी झाली. या वेळी एमएमआरडीएच्या वतीने ज्येष्ठ वकील ॲड. मिलिंद मोरे आणि ॲड. संकेत मोने यांनी बाजू मांडली.